महाराष्ट्र शासन

# जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण पालघर, जिल्हा पालघर यांचे कार्यालय

पार्श्वनाथ ९ इमारत, बिडको नाका,
नवली, ता.पालघर, जिल्हा-पालघर
दुरध्वनी क्रमांक ०२५२५-२५३१११
Email ID : collectorpalghar@gmail.com

---

**वाचले:-**

१) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील कलम ३४ व ५१ (b)
२) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र/करोना-२०२०/ प्र.क्र.५८/ आरोग्य ५ दि.१४/०३/२०२०.
३) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७.
४) सार्वजनिक आरोग्य विभाग, नवीन मंत्रालय मुंबई यांचेकडील करोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी निर्गमित केलेली अधिसुचना क्र/करोना २०२०/प्र.क्र.५८/आरोग्य ५ दि.१४/०३/२०२०.
५) या कार्यालयाकडील आदेश क्र/जि.आ.व्य.पालघर/कोरोना विषाणू/उद्योगव्यवसायबंद/आदेश/कावि-२१०/२० दि.१४/०३/२०२०
६) या कार्यालयाकडील आदेश क्र/जि.आ.व्य.पालघर/कोरोना विषाणू/उद्योगव्यवसायबंद/आदेश/कावि-२१८/२० दि.१५/०३/२०२०.
७) या कार्यालयाकडील आदेश क्र/जि.आ.व्य.पालघर/कोरोना विषाणू/उद्योगव्यवसायबंद/आदेश/कावि-२४१ दि.२०/०३/२०२०

---

क्र/जि.आ.व्य.पालघर/कोरोना विषाणू/उद्योग बंद/आदेश/कावि-२४५/२० दि.२०/०३/२०२०

जिल्हाधिकारी पालघर / जिल्हा पालघर

**आदेश**

ज्याअर्थी उपोद्घातातील अ.क्र.२ अन्वये मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी शासनाने करोना विषाणूचा (कोव्हिड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३ मार्च २०२० पासून लागू करुन खंड २,३ व ४ मधील तरतुदीनुसार नियमावली निर्गमित केलेली आहे.

आणि ज्याअर्थी उपोद्घातातील अ.क्र.४ अन्वये शासन अधिसुचनेनुसार जिल्हाधिकारी पालघर यांना पालघर जिल्हयाच्या कार्यक्षेत्रात कोव्हिड १९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

त्याअर्थी मी **डॉ.कैलास बा. शिंदे, जिल्हाधिकारी पालघर तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पालघर** मला उपोद्घातातील अ.क्र.४ अन्वये शासन अधिसुचनेनुसार पालघर जिल्हयाच्या कार्यक्षेत्रात कोव्हिड १९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून निर्गमित केलेल्या अधिकाराचा वापर करुन **पालघर जिल्हयाचे कार्यक्षेत्रातील सर्व प्रकारचे उद्योग व त्यांच्या आस्थापना, IT व SOFTWARE कंपन्या, तसेच त्यांना सेवा पुरविणाऱ्या आस्थापना या आजपासून दि.३१/०३/२०२० पर्यंत बंद करण्यात येत आहेत.** अशा कंपन्या त्यांचे कर्मचाऱ्यांकडून "घरुन काम" (Work From Home) करुन घेऊ शकतील.

त्यामध्ये खालील आस्थापना वगळण्यात येत आहेत.

१) पाणी पुरवठा
२) स्वच्छता विषयक सेवा
३) बँकींग सेवा
४) दूरध्वनी व संचार सेवा
५) रेल्वे व वाहतूक सेवा
६) अन्न, भाजीपाला, दूध, पिण्याचे पाणी व किराणा माल सेवा
७) दवाखाना, वैद्यकीय केंद्र, औषधालय
८) विज, पेट्रोलियम ऑईल आणि एनर्जी
९) प्रसार माध्यम
१०) बंदर
११) IT Services (आवश्यक सेवासाठी दिल्या जाणाऱ्या)
१२) उत्पादन, वाहतूक व पुरवठा सांखळी जीवनावश्यक वस्तूंचे अन्नपदार्थासह ऑनलाईन व्यापार (E-Commerce), औषधे, किटकनाशक व वैद्यकीय साहित्य, अन्नधान्य व जीवनावश्यक वस्तूंचा गोदामात साठा करणे.

Scanned with CamScanner

१३) Production and manufacturing process ज्यामध्ये continuity of process ची गरज आहे, अशा आस्थापना कमीत कमी कर्मचारी वर्ग (कमाल २५%) यांचेसह सुरु ठेवावी.

१४) औषधे व वैद्यकीय साहित्य सामुग्री तयार करणाऱ्या कंपन्या, सॅनिटायजर, Disinfectants, Cold Storages for storage of essential food items like Vegetables, Milk and other eatables, मास्क तयार करणाऱ्या कंपन्या व इतर जीवनावश्यक वस्तू तयार करणाऱ्या, पॅकींग करणाऱ्या, ती साठविणाऱ्या आस्थापना / गोदामे तसेच त्यांना या कामासाठी सेवा पुरविणाऱ्या आस्थापना कमीत कमी मनुष्यबळावर कार्यरत ठेवू शकतात.

वरील आस्थापनेवरील आजारी कामगार इतर कामगारांच्या संपर्कात येणार नाहीत, कंपनीच्या निर्जंतुकीकरण करणेबाबत, आस्थापनेमध्ये काम करणाऱ्या कामगारांच्या आरोग्या विषयी आवश्यक ती दक्षता व खबरदारी संबंधित आस्थापनांनी घेणे गरजेचे आहे.

**तथापि कामगार/कर्मचारी यांना कामावरुन कमी करु नये किंवा त्यांच्या पगारात कपात करु नये.**

उक्त आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी. सदरहू आदेशाची अंमलबजावणी करण्यास संबंधितांनी टाळाटाळ केल्यास अथवा विरोध दर्शविल्यास संबंधितांचे विरुध्द आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील ५१ (b), भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७ व भारतीय दंड संहिता (४५ ऑफ १८६०) च्या कलम १८८ नुसार दंडनिय/कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

सदरचा आदेश आज दि.२०/०३/२०२० रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला असे.

**सही/-xxx**
(डॉ.कैलास बा.शिंदे)
**जिल्हाधिकारी पालघर तथा**
**अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन**
**प्राधिकरण, पालघर**

**प्रत:-**

१) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार कॉम्प्लेक्स बिल्डींग, नवीन मंत्रालय, मुंबई-४००००१ यांना माहितीसाठी सविनय सादर.
२) मा.विभागीय आयुक्त, कोंकण विभाग, कोंकण भवन, नवी मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.
३) आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
४) पोलीस अधीक्षक पालघर यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
५) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिsषद पालघर यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
६) उपविभागीय अधिकारी वसई/पालघर/डहाणू/जव्हार/वाडा यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
७) तहसीलदार वसई/पालघर/डहाणू/तलासरी/मोखाडा/जव्हार/विक्रमगड/वाडा यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
८) जिल्हा शल्य चिकित्सक पालघर यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
९) सह संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय यांचे कार्यालय,१ ला मजला, मंगेश भुवन, अंबाडी रोड, वसई (प.), ता.वसई, जि.पालघर-
   २/- उपरोक्त सुचनांप्रमाणे आपले स्तरावरुन आवश्यक ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.
१०) कामगार उप आयुक्त, एम.आय.डी.सी. कर्मचारी वसाहत, तारापूर-बोईसर रोड, बोईसर (प.), ता.जि.पालघर -
   २/- उपरोक्त सुचनांप्रमाणे आपले स्तरावरुन आवश्यक ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.
११) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, संखे कॉलनी, आर्यन शाळेच्या मागे, लोकमान्यनगर रोड, पालघर (प.), ता.जि.पालघर यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
१२) कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ, टाकीनाका, एमआयडीसी, बोईसर-
   २/- उपरोक्त सुचनांप्रमाणे आपले स्तरावरुन आवश्यक ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.
१३) मुख्याधिकारी नगरपंचायत/नगरपरिषद पालघर/डहाणू/जव्हार/तलासरी/विक्रमगड/वाडा/मोखाडा
   २/- उपरोक्त सुचनांप्रमाणे आपले स्तरावरुन आवश्यक ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.
१४) जिल्हा महिती अधिकारी पालघर यांना आवश्यक त्या प्रसिध्दीकरीता.

जिल्हाधिकारी पालघर तथा
अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन
प्राधिकरण, पालघर

Scanned with CamScanner